Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# शांताबाई शेळके यांच्या कवितेतील भाव जाणिवा

**डॉ रामलीला सुदामराव पवार**
मराठी विभाग प्रमुख
कला महाविद्यालय, तीर्थपुरी
मो.नं. 9420954467

**प्रस्तावना:**

मराठी साहित्यामध्ये महिला साहित्यिक म्हणून शांताबाई शेळके यांचे स्थान निश्चित वेगळे आहे. मराठी साहित्याच्या विविध प्रांतात त्यांच्या लेखनीचा संचार होतांना दिसतो. कथा, कादंबरी, कविता, व्यक्तिचित्रे, ललित लेख, समीक्षा, स्फूटलेख, बालगीते, चित्रपटगीते, कोळीगीते, लावण्या इत्यादी वाड्मय प्रकार शांताबाई शेळके यांनी समर्थपणे हाताळले आहेत. मराठी मनाला झपाटून टाकणारी कविता शांताबाईंनी लिहिली आहे. त्यांच्या अनुभवाने आणि निरीक्षणाने जीवनाला उपकारक मुल्ये सिध्द झालेली आहेत. उत्कट भावनाविष्कार हा त्यांचा साहित्याचा स्थायीभाव आहे. किंबहुना भावकविता हेच त्यांच्या लेखनाचे कार्यक्षेत्र आहे.आशयाशी एकरूपता साधणारी आंतरीक उर्मी आणि आत्मनिष्ठा त्यातून व्यक्त होते.

**शांताबाई शेळके यांचा परिचय:**

शांताबाई शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२१ मध्ये झाला.शांताबाईच्या आईवडिलांना पिढीजात कोष्टकाचा व्यवसाय करत. शांताबाईचे आजोबा शिक्षणाचे महत्त्व जाणत.ते स्वतः शिक्षक होते. पुढे त्यांनी आपल्या मुलांना शिकवले अशा दुरदृष्टी असणाऱ्या शिक्षणप्रेमी आजोबाची नातं शाळेपासून दूर राहिली असती तर आश्चर्यच! पुढे त्यादेखील शिक्षण घेऊन शिक्षिका, प्राध्यापिका सहसंपादक अशा विविध भूमिका त्यांनी उठवल्या आहेत. शांताबाई शेळके यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. त्यांनी वृत्तपत्रापासून ते आकाशवाणी पर्यंत, टीव्ही पासून ते सिनेमा पर्यंत प्रवास करत त्यांची कविता वाचकांपर्यंत पोहोचली. त्यांच्या जीवनपासून त्यांची कविता ही वेगळी करता येणार नाही. ‘कविता’ हा त्यांचा आवडता वांग्मय प्रकार आहे कवितेबद्दल त्यांच्या मनात गाढ विश्वास व श्रद्धा होती म्हणूनच त्या कवितेशी हितगुज करताना दिसतात. शांताबाई शेळके यांचा पहिला कविता संग्रह ‘वर्षा’ हा १९४७ साली प्रकाशित झाला. त्यानंतर त्यांचे ‘रूपसी’, ‘गोंदण’,‘कळ्यांचे दिवस फुलांच्या राती’, ‘तोच चंद्रमा’, ‘जन्मजान्हवी’, ‘इत्यर्थ’ इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित झाले. शांताबाईंना आपला सूर सापडला तो गीत रचनेत नाटक, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, इत्यादी लोकसंवाद माध्यमांसाठी गीतांची त्यांनी अतिशय कौशल्याने रचना केली आहे. त्यांनी ‘बालकविता’ हा वांड्मय प्रकार देखील अत्यंत समर्थपणे हाताळला आहे. त्यामध्ये ‘टिपटिप चांदणी’, ‘थुई थुई नाच रे मोरा’, ‘चिमणचारा’, ‘वाऱ्याचा रंग’, ‘झोपेचा गाव’ इत्यादी बालगीतसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांची गीते लोकप्रिय ठरली आहेत. शांताबाई शेळके यांची कविता विशेषता आत्मपर आहे. निसर्गावर त्यांचे विलक्षण प्रेम आहे. निसर्गातल्या कितीतरी गोष्टींची त्यांना भुरळ पडते व आपल्या ऐकलेपणाची बोच त्या निसर्गाच्या सहवासात विसरतात. निसर्ग प्रमाणेच ईश्वराचा त्यांना आधार वाटतो व ईश्वराच्या सानिध्यात एकाकीपण संपल्यासारखे वाटते. शांती व समाधान मिळते म्हणून त्यांना निसर्गात सुद्धा ईश्वरी दर्शन घडते.

**शांताबाई शेळके यांच्या लेखणाची प्रेरणा:**

शांताबाई शेळके यांच्या कवितेची पार्श्वभूमी लक्षात घेता असता असे दिसते की, त्यांच्या सुरुवातीच्या कवितांवर रविकिरण मंडळाची छाप होती. आरंभीच्या त्यांच्या कवितांवर रविकिरण मंडळाचा प्रभाव असला तरी त्यातून बाहेर पडून तिला तिचे पृथंगात्मक असे रुप यथावकाश प्राप्त झाले. शांताबाईंच्या मते, जातिवंत कवी हा जन्मावाच लागतो. त्याची योग्यता जाणणारे रसिक नेहमी भेटतातच असे नाही. त्यांच्या मते सहजपणे मिळणाऱ्या गोष्टीत गोडी नसते जे सुदूर जे अथांग तिथे माणसाचे मन

धावते पण व्यवहारी जग अशा ध्येयवाद्यांना 'वेडे' म्हणते. तरीही त्या ध्येय मार्गावरूनच चालण्याचा त्यांचा निर्धार असतो. शांताबाईंचे काव्यात्म मन हे ध्येय मार्गावरूनच चालण्या साठी सर्वस्व पणाला लावण्यासाठी धडपडते. स्वप्न रंजनात्मक मूर्ती मुळे माधव जुलियनांच्या स्वभावाची त्यांचे किती जवळचे नाते आहे हे लक्षात येते. याशिवाय शांताबाई आपल्यावर प्रभाव टाकणाऱ्या पुस्तकाबद्दल सांगताना म्हणतात माझ्या मनावर खोल ठसा उमटवणारे पुस्तक म्हणजे 'सुगी' हे होय.त्यांच्यातला कलावंत सजग आहे स्वतःचे जग तो निर्माण करतो आहे स्वाभाविकच व्यवहारी जगाचा त्यांच्या नियमांचा विरुद्ध बंड करण्याची भावना त्यांच्या तील कलावंत करतो. यासाठी त्या निसर्गाचा आधार घेतात त्यांच्या कवितेत निसर्ग प्रतिमा ओतपोत भरलेल्या आढळतात.

**"मातीचे झाड! झाडाची मी! माझी पुनः माती!**
**त्याच्या पानावरच्या रेषा! माझ्या तळहाती"१**

निर्मळ भाव पारदर्शक कल्पना स्वच्छ विचार सुंदर साधी सोज्वळ शब्दकळा अशा अनेक गुणांनी त्यांची निसर्ग कविता ही वेधक झाली आहे. कवितेविषयीचा जिव्हाळा त्यांच्या कवितेत ठिकठिकाणी दिसून येतो एकाकीपणाच्या भावनाही अनेक कवितेत आढळून येतात जसे की,

**"जीवन म्हणजेच एक दीर्घ विरहगीत!**
**क्षण मिलन चीरवियोग हीच ईथे रीत"२**

आपल्या आयुष्याला त्वचेसारखे चिकटलेले एकाकी पण अतिशय समर्पक शब्दात त्या मांडतात. जीवनात वाटायला आलेले अपेक्षाभंगाचे, मनोभावाने दर्शन त्यांच्या कवितेत घडते अनेक प्रतिमा आणि प्रतिकांच्या आधारे त्या व्यक्त होतात. शांताबाईंच्या कवितेतून अनेक अभागी स्त्रियांचे एक आगळेच दुःख 'गोंदण' कविता संग्रहातल्या एका कवितेतून त्यांनी मुखर केले आहे. जिथे दुःख वाट्याला येते, पतीचे मुख पाहून पतीला काय वाटले त्याचे मनोरम दर्शन शांताबाईंनी घडविले आहे. पुरुषांच्या प्रेमाभावाचे चित्र स्त्रियांच्या कवितेत सामान्यता दुर्मिळ असते म्हणून त्याचा आवर्जून उल्लेख येथे केला पाहिजे शांताबाईंच्या चिंतनशील मनाचा प्रत्यय त्यांच्या कवितातून नेहमीच येतो. त्यांच्या संग्रहातील कवितेबद्दल कवी वा.रा.कांत म्हणतात "पूर्वी भावगीताच्या कुळात असणारी कविता तिला येथे तप्त सोन्याची कळा प्राप्त झालेली आहे तिच्यात कांती आहे आणि भोगलेल्या दुःखाची आचही आहे"३ शांताबाईंच्या अभिव्यक्तीचा प्रामाणिकपणा आणि प्रांजळपणा हृदयस्पर्शी आहे आपल्या मनाचा खोल शोध घेण्याची त्या धडपड करत आहेत हे सतत जाणवते. आपल्या एकाकीपणाचा शोध घेत चाललेली शांताबाईंची कविता मनात दीर्घकाळ रेंगाळत राहते आणि रसिक मनात व वांड्मय इतिहासात मानाने उभे राहिली आहे.

**शांताबाईचा जीवनविषयक दृष्टिकोन:**

शांताबाई शेळके यांच्या साहित्यातून त्यांचा जीवन दृष्टिकोन व्यक्त होतांना दिसतो. सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला येणारे निराशा, मनभंग, दुःख, अपमान इत्यादीचे चित्रण त्यांच्या साहित्यातून दिसून येते. शांताबाई या अंधश्रद्धाळू भाबड्या भक्त नाहीत तशा त्या कट्टर अश्राध्दही नाहीत. विश्वाच्या असणाऱ्या मागे घडलेल्या अदृश्य शक्तीची त्यांना जाणीव आहे म्हणून त्या लिहितात, "विश्वाचा हा जो अफाट पसारा आहे याच्या पाठीमागे काहीतरी संगती काहीतरी व्यवस्था खचित असली पाहिजे. या साऱ्याचा कोणीतरी शासता कुणीतरी नियंता असलाच पाहिजे, त्याला परमेश्वर म्हणा, निसर्ग म्हणा, की आणखी कोणतेही नाव द्या पण अशी कोणीतरी शक्ती अहर्निश जागरूकपणे, सावधपणे आणि प्रेमळ दक्षतेने हे सारे विश्व सांभाळीत आहे यात शंका नाही"४

कित्येक माणसे जीवनाबरोबर सतत भांडत असतात. अनेक गोष्टींची अपेक्षा करत असतात. पैसा असूनही समाधानी नसतात. कर्तुत्व गाजवले की संधी मिळाली पाहिजे, अशी अपेक्षा करत असतात, अशी माणसे पाहिली की, शांताबाईंना अशा माणसाची दया येते. त्या म्हणतात, "जीवनाविरुद्ध जगण्याऐवजी 'जीवनाबरोबर' जगायला माणसाने शिकले पाहिजे. जीवित हे असे आहे. त्यात आपण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत बदल करू शकतो. त्यापलीकडे ते बदलणे शक्य नसते. जीवनाच्या हातात हात घालून आनंदाने पुढे जायला शिकले पाहिजे. जीवनातील कडे बघण्याची ही दृष्टी माणसाने एकदा पत्कारली तर

एरवी जे वृक्ष, निरर्थक आणि उजाड वाटत असते त्यांनाही सुखाचे आणि आनंदाचे अनपेक्षित निर्झर कितीदा तरी आढळून येतात."५ जीवनाचा आशावादीन वृत्तीने स्वीकार करणाऱ्या शांता शेळके यांचे मत आपल्याला दूरदृष्टी बाळगणारे दिसते.

**शांताबाई शेळके यांच्या कवितेतील भावजाणिवा:**

शांताबाई शेळके यांच्या कविता केशवसुत, बालकवी यांच्या धाटनीची कविता दिसून येते. केशवसुत त्यांचे आदर्श होते.त्यांच्या कवितेत कमालीचे नैराश्य दिसून येते. आपल्या दुःखाची तीव्रता कमी करण्यासाठी कवयित्री निसर्गाला साद घालू लागते. परंतु ती दुःखावर केलेली तात्पुरती मलमपट्टी असते. चिरंतन दुःख कधीही कमी होत नाही उलट एकांतात जखम अधिकच भळभळते व मन एकलेपणाच्या जाणिवेने निराश होते. त्याच निराशेत कवयित्री आपल्या भावना कवितेच्या माध्यमातून व्यक्त करते.

**आता रचित मी काव्य, परी ते नाव कोणा वाचुनी!**
**तू नाही स सखिया! ही आसवे लोचनी!**

एकाकी आयुष्याचे ओझे वाहत शेवटचा प्रवास चालू राहतो. म्हणूनच त्या कवितेला आपली जीवाभावाची सखी मानतात. त्या म्हणतात कविते तूच माझी मैत्रीण आहेस हे जगणे कठोर आहे या जगात स्वप्नांना मुळीच स्थान नसते. तुझ्याचमुळे मला स्वप्नांचा भास होतो. तुझ्याचमुळे जीवन नंदनवन वाटते. शांताबाईंच्या कवितेत जीवन विषयक चिंतन आढळून येते. मानवी मन मोठेच विचित्र कधी ते वसंत ऋतूप्रमाणे फुलते, तर कधी त्याला शिरिष्यचा स्पर्श होतो. जीवन हर्षाने व्यापलेले आहे तसेच दुःखाने सुद्धा भरलेले आहे. जीवनाचा वेध घेतात. जीवनात एकाकी वाटचाल करायची आहे हे अंतिम सत्य कवयित्रीला माहित आहे. नियतीच्या वादळात सापडलेल्या नाव्हे प्रमाणे जीवनात अंधार पसरला आहे. तेव्हा कुठपर्यंत चालायचा असा प्रश्न कवयित्रीला पडतो व कवयित्री म्हणते,

**"हातही थकले वल्ही मारूनी**
**शिनला जीवही प्रवास करूनी**
**आणि लागले किनाऱ्याकडे डोळे हे शांत!"**

आपल्या साहित्याच्या मर्यादा कळणारे अगदीच कमी. शांताबाई मात्र सफाईदारपणे स्वतःच्या कवितेतील मर्यादा जाणतात. कवितेत त्यांना कुणाच्यातरी जीवनात आनंदाचे चांदणे पसरवण्याची ओढ जाणवते. हिरवळीच्या कोमल फुलावरचं फुलपाखरू होण्यात कवित्रीला धन्यता वाटते. काव्याचा आनंद घेण्याच्या नादात कवयित्री जीवनातल्या सुंदर काव्यालाच मुकलेली दिसते. कवयित्री शब्दांमध्ये गुंतून जाते व हे दुख एकटेपणाचे दुःख कवित्रीला खूप उशिरा कळते व ती म्हणते,

**"सदाच मी एकली जीवनी सदाच मी एकली**
**आफाट जीवन मार्गावरती**
**जरी शोधल्या किती संगती**
**दुरावल्या त्या सकलही अंती**
**साथ द्यावया आता राहिली केवळ मम सावली"**

शांताबाईंची आत्मपरीक्षणात्मक कविता दुःखाने व्यापलेली आहे. दारून प्रेमाभंगाच्या दुखःने झालेली जीवनाची वाटचाल एकाकी करताना म्हणतात, 'कोणी ना सांगाती ज्याच्या वृक्ष ठेवून ठेवीन हे शीर निश्चित मी' जीवनात आलेले हे फार मोठे अपयश शांताबाईंनी कवितेच्या ओळीतून मांडले आहे. प्रेमात दारून निराशा आली, तरी प्रीतीचे पुष्प फुलवत राहणे हा कवयित्रीला जडलेला छंद आहे. रातराणीच्या गंधात प्रीतीने न्हाऊन निघावे ही कवयित्रीची मनस्वी इच्छा व्यक्त होते. वैयक्तिक जीवनात शांताबाईंना प्रीतीविषयक आलेले अपयश कवितांमधून सूचित होते.

शांताबाई चे निसर्गप्रेम अलौकिक आहे. निसर्गावर त्या अपत्याप्रमाणे माया करतात निसर्गाचे सुंदर रूप बघून त्यांना निसर्गातच विलिन व्हावेसे वाटते. आपल्या मनातील सुखदुःखाचे प्रतिबिंब त्यां सर्वातच पाहतात. निसर्गामध्ये त्यांना शांती आणि समाधान भेटते निसर्गातील प्रत्येक घटक त्यांना आपला वाटतो त्या निसर्गाशी मूक भाषेत संवाद साधू लागतात,

**"स्नेहभाव आम्हातील**
**नाही कुणा कळायचे**
**ज्ञात आहे आम्हालाच**
**मुक्त नाते हे आमचे"**

चराचरात आनंद ओसंडून वाहत आहे. सृष्टीचे सोनेरी मृदू हास्य विलेसित आहे.ते हास्य आपल्या चेहऱ्यावर येईल का हे कवितेचे दुःख आहे. 'ही प्रेमळ शितल हिरवळ मूकपणाने ऐकून घे उदास माझे गाणे'तो ऐकतो, साथ देतो तो प्रियकरच नव्हे काय? कवयित्री शांताबाईना निसर्ग आपला प्रियकर वाटतो. निसर्ग आपले दु:ख जाणून घेणारा आहे. हे त्यांचे वैयक्तिक मत आहे. शांताबाईचे वैयक्तिक जीवन म्हणजे एक 'योगिनी' स्त्रीचे दर्शन होय, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. यातील स्त्री ही प्रेमभंगाने व्याकुळलेली एक मनस्विनी आहे अंधारात भेटून गेलेल्या एका प्रियकराची आठवण आस्वात बुडवून जगणारी ती एक प्रियतमेची कहाणी आहे. स्त्रीच्या आधी रदयात निर्माण झालेले व्याकुळ मन बाहेर तिची वाट पाहणारा तिचा प्रियकर व याचवेळी प्रियतमेत असलेली खानदानी स्त्री रंगवताना कवयित्री दिसते,

**"माथ्यावरूनी सावरून घेतला पदर नीट**
**दार उघडून बाहेर उभे ठाकले धीट"**

शांताबाई यांच्या कविता 'स्व' जाणिवांचा शोध घेताना दिसतात. माझ्यातली जी दुसरी मी आहे तिच्यात व माझ्यात कायम दुरावा आहे असे त्या स्वतःविषयीच सांगतात. स्वतःच स्वतःला परके असणे असे मानणे हे दुःखाचे मूळ नाही. मात्र 'स्व' शोध लागला की स्वजाणिवेतही फरक पडतो. शांताबाईंनी प्रामुख्याने आत्मविष्कार प्रधान कविता निवडल्या आहेत. स्वतःचे दुःख, विवंचना, पराभव, आत्मिकरूप या साऱ्यांना त्यांनी कवितेपासून दूरच ठेवले आहे. ही कविता सयंत असल्यामुळे ती स्वतःला राखून ठेवण्यात यशस्वी ठरते. म्हणून शांताबाईंची कविता शालीन, संयमी व अभिजात स्त्रीरूपा सारखी आहे.

**शांताबाई शेळके यांच्या कवितेतील सौंदर्य**

शांताबाईंच्या काही कवितांमध्ये स्त्री ही नेहमी परावलंबी असते. प्रेम हे देखील असेच पर अवलंबून आहे. अशा स्त्री जीवनाच्या अशा निराशेचा खेळ कवितांमधून स्पष्ट होतो. स्त्री मनातील हळवे स्पंदन, प्रीतीची भावूकता, सहजता, प्रसन्नता, मुक्त, मुग्ध शृंगार, निरागस आत्माविष्कार, श्रद्धा, निसर्ग वेड त्यांच्या कवितेत दिसून येते. 'वर्षा' काव्यसंग्रहात जाणवणारे व्याकरणशुद्धता, शैलीचा बांधासूदपणा या गोष्टी रविकिरण मंडळामुळे आल्याचे दिसून येते. कविता ही कवयित्रीची सखी आहे.

कवयित्रीच्या वैयक्तिक जीवनात जेव्हा निघून संध्या छाया पसरल्या होत्या तेव्हा निसर्गातील पिंपळ त्यांना माया देतो पिंपळ अमावस्येच्या रात्री डोळे मिचकावीत धीर देतो गावातील चार झाडे मित्र-मैत्रिणी आहेत त्या जिवलगांची ओळख करून देताना. शांताबाईंच्या भावकविता अतिशय सुंदर आहेत. 'जिवलगा' हे शांताबाईंचे अत्यंत प्रसिद्ध विरहीगीत आहे. ती प्रियकराच्या विरहाणे व्याकुळ आहे, थकलेली आहे. या गीतामुळे रसिकही स्वतःला विसरून जाण्याचे सामर्थ्य गीताच्या शब्दात आहे.

**'जिवलगा' राहिले रे दूर घर माझे**
**पाऊल थकले माथ्यावरचे जड झाले ओझे"**

वास्तवात थकलेल्या प्रियतमेचा प्रियकर निघून गेला आहे. त्यामुळे ते दोघेही स्वप्नातील गावातच भेटतात. शांताबाईंच्या एकूण भावकविता पाहता त्या प्रीतीच्या दारुण निराशेच्या आहेत. उदास, हळव्या आहेत; म्हणूनच हे जीवनसुर मनाला चटका लावणारी भावगीते बनली आहेत. शांता शेळके यांची भाषाशैली काव्यमय असून सौंदर्यपूर्ण आहे. शांताबाईंच्या भाषाशैलीत मूळ अनुभवांचा ताजेपणा आहे, टवटवी आहे. दवबिंदू सारखे निर्माण झालेले चैतन्य आहे शांताबाईंची ही अशी नितळ प्रभावी भाषाशैली वाचकांच्या मनाला मोहिनी घातल्याशिवाय राहत नाही. शांता शेळके यांचे जीवन विषयक आकलन सूक्ष्म व विविधांगी असून त्याला अनुभवाचा आधार आहे. शांता शेळके यांची वांङमय विषयक भूमिका अविष्कारवादी असून ती अनुभव विश्वाला प्रामाणिक राहणारी आहे.

**समारोप:**

शांताबाई शेळके यांची पहिली कविता १९३९ साली लिहिली गेली. तेव्हापासून शांताबाईंनी विपुल असे लेखन केले आहे. शांताबाई या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, साहित्यिक व सामाजिक जीवनाच्या एका फार मोठा कालखंडाच्या प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. शांता शेळके या जन लोकांची भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संरक्षक आणि संवर्धक आहेत.शांता शेळके यांच्या भाव विश्वाचे जडणघडण करण्यात वांङमय संस्कारांचा मोठा वाटा आहे. शांता शेळके यांना माणसाकडे पाहण्याची दृष्टी आवडत्या पुस्तकांमुळे प्राप्त झाली आहे. उगाच काव्यमय काहीतरी लिहायचे व कल्पनेच्या आजार भराऱ्या मारायचा याचा मोह शांताबाईंच्या लेखणीला नाही त्या आपल्या कवितेतून सहज भाव प्रकटीकरण करतात त्यांच्या काव्यावर बालवयात माधव ज्युलियन यांच्या कवितेचा ठसा दिसतो. माधव जुलियन त्यांना आदर्श मानतात. प्रेमानुभवाचे चित्र मोकळेपणाने रेखाटण्याचा हातखंडा त्यांनी माधव जलियन यांच्याकडून घेतला. रवी किरण मंडळाच्या कवितेने अभिव्यक्तीसाठी जे प्रकार योजले ते शांता शेळके यांनी स्वीकारलेले आहेत. शांताबाईंचे भावगीते ही त्यांच्या व्यक्तिमत्वासारखेच साधी, अनौपचारिक आणि वाचकांना आपलीशी वाटणारी अशी आहेत. याशिवाय त्यांच्या प्रेम कविता, निसर्ग कवितादेखील मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. विविध क्षेत्रातील वेगवेगळे मनतरंग त्यांच्या तरलतेसह टिपणे ही शांत शेळके यांच्या प्रतिभा सामर्थ्याची पावतीच होईल. खट्या रंगांबरोबर विषमता, संकोच, लाज,लाजला तसेच लावणीचा देठपणा असणारी उडत्या चालीची विपुल गीतेही त्यांनी लिहिली आहेत.

**निष्कर्ष:**

१) समकालीन साहित्यिक, साहित्यविश्वातल्या घडामोडी तिथे उद्भवलेल्या काही तात्कालीक समस्या साहित्यातील वादग्रस्त प्रश्न शांता शेळके यांना लेखनास प्रवृत्त करतात.

२) उत्कटता, रंजकता, लयबद्धता सांभाळणाऱ्या त्यांच्या रचना रसिकमनावर वेगळा प्रभाव पडून जातात.

३) शांताबाईची अनुभूती स्थळकाळाची बंधने ओलांडून मानवी आत्म्याच्या एकाकीपणाशी एकरूप व्हायला पाहते आहे.

४) शांता शेळके यांना शब्दांबद्दल अनिवार प्रेम आहे शब्दांचे उगम त्यात अंतर्भूत असलेल्या विविध अर्थछटा त्यांच्यातून उमटणारी नादवलये या साऱ्यांबद्दल शांताबाईंना जिव्हाळा आहे.

५) शांता शेळके यांच्या साहित्यातून जसे त्यांचे व्यक्तिमत्व साकार होते. तसा त्यांचा जीवन विषयक दृष्टिकोनही व्यक्त होताना दिसतो.

६) शांताबाईंच्या कवितेचा फार मोठा भाग जीवन विषयक चिंतनाने व्यापला आहे.

७) शांताबाई जशा अंधश्रद्धाळू भाबड्या भक्त नाहीत अशा त्या कट्टर श्रद्धाही नाहीत विश्वाच्या पसारामागे दडलेल्या आदर्श शक्तीची त्यांना जाणीव आहे.

८) शब्दातून अर्थाकडे आणि आता अरर्थाकडून 'शब्दांच्याही पलीकडे' चाललेला हा प्रवास म्हणजे शांताबाईंच्या कवितेतील मोठीच क्रांती आहे असेच म्हणावे लागेल.

९) स्त्री मनाच्या भावनांचा वेध घेणाऱ्या शांता शेळके यांच्या अनेक कविता आहेत.

अशा प्रकारे स्त्रीमनाच्या भावनांचा वेध घेणारी शांता शेळके यांची अनेक गाणी आहेत. ती गाणी त्या त्या वेळच्या स्त्रीमनाची अवस्था व्यक्त करतात.

**संदर्भ**:

१ शांता शेळके: गोंदण : मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९७३.
२) शांता शेळके: अनोळख : अजब पुस्तकालय कोल्हापूर, मार्च १९९६.
३) शांता शेळके: जन्मजानहवी: सुरेश एजन्सी पुणे, डिसेंबर १९९०.
४) शांता शेळके: 'शब्दांच्या दुनियेत', प्र.आ.डिसेंबर १९५९, कुलकर्णी ग्रंथागार पुणे, पृष्ठ क्र. ४०.
५) तत्रैव पृष्ठ क्र. ४५.
६) तत्रैव पृष्ठ क्र. ११८.